# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबतच्या कामाचा आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा ठराव.**

व-हाळा जी.एस.आर. पासून ते वाझे मोहल्ला पर्यंतची मुख्य व-हाळा वितरण व्यवस्था ६० वर्षापेक्षा जास्त जुनी असून ती पी.एस.सी. पाईप (सिमेन्ट कॉंक्रिट पाईप) ची असल्याने कालबाहय झालेली आहे. व त्यामधून मोठया प्रमाणात पाणी गळती होत असून सदर होणा-या गळतीमुळे शहरामध्ये जलवाहिनीच्या शेवटच्या टोकास कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच सदर ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. कडून सी.सी. रोड प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्या कामाचे कार्यादेश देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून रस्त्याचे काम सूरू होण्यापूर्वी सदर ठिकाणी नवीन जलवाहिनी अंथरणे गरजेचे आहे, जेणे करून भविष्यामध्ये रस्ता खोदावा लागणार नाही. सद्यस्थितीत असलेल्या सदर जलवाहिनीद्वारे धामणकरनाका, माधवनगर, सोमानगर, अजंठा कंम्पाऊंड, कणेरी, मोहल्ला, बंदरमोहल्ला, गौरीपाडा, दर्गारोड, इद्दगाहरोड कासारआळी, वाणी आळी, रोशनबाग, भोईवाडा, भुसार मोहल्ला, ब्राम्हणआळी, हफसनआळी इत्यादी जुन्या भिवंडी शहरातील परिसरामध्ये पाणी पुरवठा होतअसून अस्तित्वात असलेली जुनी जलवाहिनी बदलनेचे काम करणे गरजचे आहे. सदर कामाकरीता आवश्यक असणारे ५०० मी.मी. व ४५० मी.मी. व्यासाचे डी.आय. पाईप व-हाळा जी.एस.आर. वितरण व्यवस्था बळकटीकरण करणेकामी २००५ साली खरेदी करण्यात आलेल्या होत्या व आजमितीस सदर पाईप उपलब्ध असून प्रशासनास हे काम करतांना ५०० मी. मी. ४५० मी. मी, ४०० मी.मी. व ३०० मी. मी. व्यासाचे डी.आय. पाईप खरेदी करावे लागणार नाहीत.

व-हाळा तलाव जी. एस. आर. जलकुंभाद्वारे २८ एम.एल.डी. पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्यात येत असून जुन्या जलवाहिनीमुळे होणा-या गळतीमुळे जुन्या भिवंडी शहरामध्ये आजही पाणी टंचाई असून त्या करीता उपरोक्त काम करणे अत्यंत गरजेचे.

धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबतच्या कामांस दि.१५/१२/२०२३ अन्वये रु. १,२०,५७,९९१/- मात्र रक्कमेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबतच्या** | **रु. १,२०,५७,९९१/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबतच्या कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा ठराव.

**ठराव क्रमांक :** ३४१

**दिनांक :** ०७ /०२/ **२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबतच्या कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. . एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील धामणकरनाका ते वाजे मोहला पर्यंत ५०० मी.मी. ४५० मी.मी., ४०० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची मुख्य वितरण डी.आय. पाईप लाईन अंथरून त्यास विविध ठिकाणी जल जोडणी वितरणनलीका, पाईप स्पेशल्स, व व्हॉल्व जोडणी करणे बाबतच्या रु. १,२०,५७,९९१/- मात्र कामाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका,भिवंडी.**

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी
## विद्युत विभाग

**विषय:- विकसीत भारत संकल्प् यांत्रेच्या टप्पा क्र. 2 अनुषंगाने करावयाच्या कामांकरिता निधि उपलब्धतेकामी लेखाशिर्ष मध्ये तरतुदी मध्ये खर्चाचे पुनर्नियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्तावना**

भारत सरकारच्या प-लॅगशिप योजनांचे लाभ लक्ष्यित लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचावेत याची खात्री करण्याच्या उददेशाने "विकसीत भारत संकल्प् यात्रा टप्पा क्रमांक 2 " देशव्यापी मोहिम केंद्र शासनाकडून राबविण्यात येत असल्याने सदर कार्यक्रमासाठी तरतुदीचे पुनर्नियोजन करणे कामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

"विकसीत भारत संकल्प् यात्रा देशव्यापी मोहिम टप्पा क्रमांक 2 केंद्र शासनाकडून दिनांक 5 फेब्रुवारी 2024 ते दि.22 फेब्रुवारी 2024 पर्यंत प्रभाग समिती क्रमांक 1 ते 5 अतंर्गत राबविण्यात येणार असून त्याकामी मंडप, टेबल, खुर्ची, कुशन खर्ची, स्टॅण्ड फॅन, साऊंड सिस्टिम, कापडी पार्टीशियन, कारपेट,जनरेटर, एल.ई.डी.प-लड लाईट, थ्री पिन,प्ल्ग स्विच इत्यादी बाबींची आवश्यकता असून त्याकामी प्रभाग निहाय अंदाजे एकूण 13 लाखांचा खर्च होणार आहे. महानगरपालिकेच्या सन 2023-24 च्या अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष् "विद्युत देयक खर्च" या तरतुदी मधून पाणीपुरवठा, ऑफिस,शौचालय, एच.टी.कनेक्शन, व स्ट्रिट लाईट देयके, वीज मिटर बसविणेची कामे करण्यात येतात. विभागा मार्फत अर्थसंकल्पातील "विद्युत देयक खर्च " या "महसुली खर्चात" रुपये 1350 लाख निधी मंजुर करण्यात आलेला होता. परंतु त्यामधून 25 लाख "रस्त्यांवर खांब लावणे" या लेखाशिर्षात वर्ग करण्यात आलेले असून त्यामुळे "विद्युत देयक खर्च" या लेखाशिर्षात 1325 लाख निधी मधून विद्युत देयकां करिता 1272 लाख निधि खर्च झालेला आहे. तरी वरिल विषयांकित कामाकरिता निधी खर्च केल्यास माहे जानेवारी व फेब्रुवारी 24 ची वीज देयके अदा करणेकामी निधी शिल्लक नाही.

विकसित भारत संकल्प् यात्रा टप्पा क्रमांक 2 याकामी करावयांच्या कामांकरिता सन 2023-24 च्या अर्थसंकल्पातील विद्युत विभागा कडिल लेखाशिर्ष "विद्युत देयक खर्च" तरतुदीं मध्ये असलेल्या शिल्लक रक्कमेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 101 (1) नुसार खालीलप्रमाणे पुनर्नियोजन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त यांच्या कडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास मा. प्रशासक तथा आयुक्त् यांनी दिनांक /02/2024 रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नुसार नमुना नं. 10 (Form No. 10) नियिक 30(3) तरतुदीच्या अधिन राहुन पुनर्नियोजन करिता प्रस्तावना सादर करण्यात येत आहे.

**या शिर्षातून**

| अनुक्रमांक | प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष् | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्ल्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | विद्युत देयक खर्च | - | 1325 लाख | 1273 लाख | 52 लाख | उपलब्ध शिल्लक निधी 52 लाख मधुन लेखाशिर्ष **गणपती, बतकम्मा, छटपुजा,महावीर** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **जयंती व इतर खर्च** मध्ये 25 लाख तरतुदीचे पुर्नविनियोजन केल्यानंतर **विद्युत देयक** खर्च या लेखाशिर्षात 27 लाख शिल्ल्क |

**हया शिर्षात**

| प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष् | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्क्म | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| गणपती, बतकम्मा, छटपुजा,महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च | - | 104 लाख | 103 लाख | 25 लाख | 25 लाख पुर्ननियोजन केल्यानंतर एकुण तरतुद 129 लाख शिल्लक तरतुद 26 लाख |

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांचे असल्याने त्याअनुषंगाने सन 2023-2024 मंजुर अंर्थसकल्पातील विद्युत विभागाकरिता असलेल्या "विकसीत भारत संकल्प् यात्रा टप्पा क्रमांक 2 " च्या अनुषंगाने करावयाच्या कामां करिता निधी उपलब्धतेकामी खर्चाचे पुर्ननियोजन करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव** प्र. 389 A

**दिनांक** 08/02/2024

**विषय:- विकसीत भारत संकल्प् यांत्रेच्या टप्पा क्र. 2 अनुषंगाने करावयाच्या कामांकरिता निधि उपलब्धतेकामी लेखाशिर्ष मध्ये तरतुदी मध्ये खर्चाचे पुर्ननियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

"विकसीत भारत संकल्प् यात्रा टप्पा क्रमांक 2" च्या अनुषंगाने करावयाच्या कामां करिता निधी उपलब्धतेकामी तरतुदींचे पुर्ननियोजन करणेकामी प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), शहर अभियंता, मुख्या लेखा परिक्षक, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, अतिरीक्त् आयुक्त् यांनी केलेल्या शिफारशीसी नुसार नगरविकास विभागाकडिल शासन निर्णय क्रमांक एम.सी.ओ. -2020/प्र.क्र.71(भाग-2)नवी 14 दिनांक 6 जून 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विषेशत: कलम 452 अ च्या (1 अ ) व (1 ब ) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार श्री.अजय वैद्य प्रशासक विद्युत विभागाकडिल गणपती उत्सव, बतकम्मा, छटपूजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च या लेखाशिर्षात रुपये 25 लाख तरतुदींचे पुर्ननियोजन करण्यास मान्य्ता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त्**
O/C **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

c-5

दिनांक -०५/०२/२०२४

**प्रेषक :-** **मा. आयुक्त, भिवंडी नि. शहर महानगरपालिका**

**प्रति :-** **नगरसचिव, भिवंडी नि. शहर महानगरपालिका**

**विषय -राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (भिवंडी नि. शहर महानगरपालिका) अंतर्गत मंजूर बी. जी. पी. दवाखाना (बाई गुलबाई पेटीट) येथील अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर करिता आवश्यक साधन सामुग्री खरेदी करणेकामी पुर्नविनियोजन (Reappropriation) करणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्तावना,**

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यांत येते की, भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात नागरी वस्त्यांची घनता विचारात घेऊन नागरिकांना वैद्यकीय पायाभूत सुविधा/आरोग्य सेवा उपलब्ध करणेसाठी सद्यस्थितीत भिवंडी महानगरपालिकेचे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मंजूर बी. जी. पी. दवाखाना (बाई गुलबाई पेटीट) येथे ५० खाटांचे अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर (UCHC) चे बांधकाम पूर्ण करण्यांत आले असून, माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये सदर UCHC चे उद्‌घाटन करुन, त्याचे लोकार्पण करणेचे प्रस्तावित आहे.

सदर UCHC कार्यान्वीय करणेकरीता लागणाऱ्या आवश्यक वैध्यकीय साधन सामुग्री व त्याचे बाजारभावाप्रमाणे होणारा एकूण खर्च जीएसटी सहीत खर्चाचा तपशिल पृ.क्र. N-१ ते N-५ वर नमुद केलेला आहे. उपरोल्लेखित वैद्यकीय साधन सामुग्री खरेदी करीता अंदाजित रक्कम रु. २,१०,८८,२०६/- (रक्कम रुपये दोन करोड दहा लाख अठ्याऐंशी हजार दोनशे सहा मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये "लेखाशिर्ष- मनपा दवाखान्याकरीता संरक्षक मित/फर्निचर/वैद्यकीय साहित्य इ. खरेदी अंतर्गत रक्कम रु. ३२०.०० लाख तरतूद ठेवण्यांत आली असून, त्यापैकी आतापर्यंत रक्कम रु.२१३.६१ लाख खर्च प्रस्तावित करण्यांत आलेला असून, सद्यस्थित उक्त लेखा शिर्षा अंतर्गत रक्कम रु. १०६.३९ लाख इतकी तरतूद शिल्लक आहे. त्यामुळे, उपरोल्लेखित वैद्यकीय साधन सामुग्री खरेदी करणेकरीता लेखा शिर्षा अंतर्गत रक्कम रु. १०४.४९ लाख निधीची कमतरता असल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ अंतर्गत पुर्नविनियोजन करुन घेणे कामी मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

**सोबत- नमुना क्र. १० नियम ३०(३) विवरण पत्र सादर करण्यांत आलेले आहे.**

मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या मान्यतेने.

Mahadik

**(अजित मनोहर महाडिक)**
**प्र. प्रशासकीय अधिकारी,**
**बी. जी. पी. दवाखाना,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.**

**प्रशासकीय ठराव क्र.** ३४२

दि. ०५/०२/२०२४

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. प्रतिनि-२०२३/प्र.क्र.११९/नवि-१४, दि. ०९/०६/२०२३ अन्वये महाराष्ट्र अधिनियमातील कलम ४५२ अ (१अ) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, प्र. प्रशासकीय अधिकारी, बी. जी. पी. दवाखाना यांनी प्रस्तावित केल्यानुसार व प्र. वैद्यकीय अधिक्षक, बी.जी.पी. दवाखाना, लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, अतिरिक्त आयुक्त (२) यांनी शिफारस केल्यानुसार सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये "लेखाशिर्ष-मनपा दवाखान्याकरीता संरक्षक भित/फर्निचर/वैद्यकीय साहित्य इ. खरेदी" याकामी अंदाजपत्रकीय निधी तरतूदीचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व लेखा संहिता-१९७१ मधील नियम ३० (३) अन्वये सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार दर्शविल्याप्रमाणे "लेखाशिर्ष-स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृह देखभाल व दुरुस्ती" अंतर्गत रु. 600.00 लाखाची तरतूद असून, त्यापैकी आतापर्यंत रक्कम रु. 260.00 लाख खर्च प्रस्तावित करण्यांत आलेला आहे व सद्यस्थितीत या लेखा शिर्षा अंतर्गत रक्कम रु. 340,00 लाख इतकी तरतूद शिल्लक आहे, सदर शिल्लक तरतुदीमधुन रक्कम रु. 110.00 लाखाची तरतूद "लेखाशिर्ष-मनपा दवाखान्याकरीता संरक्षक भित/फर्निचर/वैद्यकीय साहित्य इ. खरेदी" या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन (Reappropriation) करण्यास व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मंजूर बी. जी. पी. दवाखाना (बाई गुलबाई पेटीट) येथे ५० खाटांचे अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर (UCHC) कार्यान्वीत करणेकरीता लागणाऱ्या आवश्यक वैद्यकीय साधन सामुग्री व त्याचे बाजारभावाप्रमाणे होणाऱ्या जीएसटी सहीत एकूण खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

C-1

नमुना क्र. १०

नियम ३०(३) पहा

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

| या लेखा शिर्षातुन | | | | | या लेखा शिर्षामध्ये | | | | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रधान, गौण व तपशिलवार माहिती | कामाचा तपशील | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार माहिती | कामाचा तपशील | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | |
| D-२/५ स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृह देखभाल व दुरुस्ती | स्व. मिनाताई ठाकरे नाट्यागृह दुरुस्ती | रु. ६००.०० लक्ष | रु. २६०.०० लक्ष | रु. ३४०.०० लक्ष | मनपा दवाखान्याकरीता संरक्षक भिंत/फर्निचर/वैद्यकीय साहित्य इ. खरेदी | राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (भिवंडी निजामपूर महानगरपालिका) अंतर्गत मंजूर बी.जी.पी. दवाखाना (बाई गुलबाई पेटीट) येथील अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर (UCHC) करीता आवश्यक वैद्यकीय साधन सामुग्री खरेदी करणे | रु. ३ कोटी २० लाख | रु. २ कोटी १३ लाख ६१ हजार | रु. १ कोटी ६ लाख ३९ हजार | रु. १ कोटी १० लाख | सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात स्व. मिनाताई ठाकरे नाट्यगृह देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षातुन रक्कम रु. ६ कोटी तरतूद निधी मधुन रक्कम रु. १ कोटी १० लाख मनपा दवाखान्याकरीता संरक्षक भिंत/फर्निचर/वैद्यकीय साहित्य इ. खरेदी या लेखा शिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणेत येत आहेत. |

वैद्यकीय अधिक्षक, भिवंडी नि. शहर महानगरपालिका — शहर अभियंता, भिवंडी नि. शहर महानगरपालिका — मुख्य लेखा परिक्षक, भिवंडी नि. शहर महानगरपालिका — मुख्य लेखा व वित्त अधिकारी, भिवंडी नि. शहर महानगरपालिका — अतिरिक्त आयुक्त (२), भिवंडी नि. शहर महानगरपालिका — प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी नि. शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

प्रस्तावना :

**विषय – शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये डी.पी.टी.सी. अंतर्गत निधी मिळण्याबाबत मा. श्री. कपिल मोरेश्वर पाटील, राज्यमंत्री पंचायत राज मंत्रालय,भारत सरकार यांनी दि.६/१०/२०२३ रोजी तसेच मा.श्री.सुभाष माने,जिल्हा प्रमुख शिवसेना,भिवंडी यांनी दि. २४/११/२०२३ रोजी तसेच ना श्री. शंभुरा देसाई ,पालक मंत्री, ठाणे यांनी दि.१९/१२/२०२३ अन्वये मा.जिल्हा अधिकारी, ठाणे यांचेकडे मागणी केली असून त्या अनुषंगाने मा.नियोजन अधिकारी ठाणे यांनी कामे अनुज्ञेय आहे किंवा कसे हे तपासून कामाबाबत स्थळ पाहणी करून शासन हिस्सा ७० टक्के व मनपा हिस्सा ३० टक्के प्रमाणे आवश्यक त्या बाबीसह प्रस्ताव सादर करण्याचे संदर्भिय पत्र क्र.१,२ व ३ अन्वये भिवंडी मनपास कळविले असून संदर्भ क्र. १ मधील नमुद कामे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रु. लाखात) | शासन हिस्सा ७० टक्के (रु.लाखात) | मनपा हिस्सा ३० टक्के (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दील वॉर्ड क्र.२३ मधील जया कांची ते भाकरे किराणा व शिवमंदिर पर्यंत गटार पाथवेज रस्ता तयार करणे | २०.०० | १४.०० | ६.०० |
| २ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दील वॉर्ड क्र.२३ हनुमान नगर मुख्य गेट समोर संजय गायकवाड शाळा ते डॉ. विजय पटेल दवाखाना पर्यंत रस्ता तयार करणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| ३ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दील वॉर्ड क्र.२० (अ) देवजीनगर येथिल सुरज हॉटेल ते मनपा शाळा क्र. ४३ ते आण्णाभाऊ साठे प्रवेशद्वार पर्यत गटर व पायवाटा तयार करणे | १५.०० | १०.५० | ४.५० |
| ४ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दील वॉर्ड क्र.२० (अ) देवजीनगर मध्ये विशाल बिल्डींग,शहा हॉस्पीटल आयुष ऑटोमोबाइल या परिसरात कॉंक्रिटरसता तयार करणे | १५.०० | १०.५० | ४.५० |
| ५ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.२० (अ) साठे नगर मधील मातंग ऋषी येथे सभामंडप बांधणे | १५.०० | १०.५० | ४.५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.२० (अ) साठेनगर मधील आंधुरे गल्ली व कोंबडपाडा येथे सभामंडप बांधणे | २०.०० | १४.०० | ६.०० |
| ७ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. २० ध्येसाई कम्युनिकेशन ते शिवमंदीर कॉक्रिट रस्ता तयार करणे. | १००.०० | ७०.०० | ३०.०० |
| ८ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. २० मध्ये साई कम्युनिकेशन ते शिव मंदीर कॉक्रिट रस्ता तयार करणे. | ५०.०० | ३५.०० | १५.०० |
| ९ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १९ मध्ये बालाजी हॉटेल ते हनुमान मंदीर सिमेंट कॉक्रिट रस्ता तयार करणे | ५०.०० | ३५.०० | १५.०० |
| १० | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.१७ मध्ये पाठारे कंम्पाउंड येथे गटर तयार करणे, | २५.०० | १७.५० | ७.५० |
| ११ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १७ पटेल कंपाऊंड स्टार हॉटेल पासुन ते पटेल मंजील पर्यंत रस्ता तयार करणे | ३०.०० | २१.०० | ९.०० |
| १२ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १७ पटेल कंपाऊंड कादर सोलंकी यांच्या घरापासून ते दिन मोहम्मद मंजील पर्यंत रस्ता तयार करणे | ३०.०० | २१.०० | ९.०० |
| १३ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १७ पटेल कंपाऊंड मध्ये कॉक्रिट रस्ता तयार करणे. | २५.०० | १७.५० | ७.५० |
| १४ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १७ व-हाळदेवीनगर मध्ये सभामंडप बांधणे. | २५.०० | १७.५० | ७.५० |
| १५ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १७. व-हाळदेवीनगर मध्ये गटार व पाथवेज बांधणे. | २५.०० | १७.५० | ७.५० |
| १६ | भिवंडी- निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १६ शास्त्री नगर, गणपती चौक ते सल्लाउद्दीन यांच्या घरापर्यंत कॉक्रिट रस्ता तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| १७ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १६ हनुमान मंदीर परिसरात कॉक्रिट रस्ता तयार करणे. | ५०.०० | ३५.०० | १५.०० |
| १८ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १६ कृष्णा कॉप्लेक्स ते लिज्जत पापड ऑफिस च्या पुढे रस्ता तयार करणे. | ३०.०० | २१.०० | ९.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रस्ता तयार करणे. | | | |
| १९ | भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १५ मधील नित्यानंद मंदीरासमोर कॉक्रिट रस्ता तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| २० | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. १५ अ मध्ये जी चाळ व केजीएन चौक ते माध्यमिक शाळा व गणपतीमंदिर पर्यंत नादुरूस्त गटर पायवाट तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| २१ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. १५ क मध्ये श्री. साजीद अन्सारी यांचे घर ते मस्जिद पर्य त गटर पायवाट तयार करणे. | १०.०० | ७.०० | ३.०० |
| २२ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १४ शकिफ कंपाऊंड येथे रस्ता व गटार करणे. | २५.०० | १७.५० | ७.५० |
| २३ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १४ सहयोग नगर, गोविंद नगर येथे कॉक्रिट रस्ता तयार करणे. | ५०.०० | ३५.०० | १५.०० |
| २४ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १४ रावजी नगर येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| २५ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. १४ सुभाष नगर येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| २६ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. १३ क मध्ये भारत डोंगरे घर ते काशिनाथ पांगळया नाईक ते री. देवीदास नाईक यांचे घरा पर्यत पायवाट तयार करणे | २०.०० | १४.०० | ६.०० |
| २७ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. १३ क मध्ये मच्छींद्र नाईक ते कृष्णा नगर पर्यंत पायवाट तयार करणे | २०.०० | १४.०० | ६.०० |
| २८ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. १३ क मध्ये विश्वनाथ नाईक यांचे घर ते गोविंद पाटील यांचे घरापर्यंत पायवाट तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| २९ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ११ अनिस मेमन कंपाऊंड आटीक किराणा परिसरात गटार व कॉक्रिट रस्ता तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| ३० | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. | २५.०० | १७.५० | ७.५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ०९ काप आळी परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करणे. | | | |
| ३१ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ०८ काप आली स्मशानभूमी परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करणे | २५.०० | १७.५० | ७.५० |
| ३२ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ०८ घुंगटनगर मधील हनुमानमंदीर परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करणे. | २५.०० | १७.५० | ७.५० |
| ३३ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ०८ घुंगटनगर मध्ये गटार व पाथवेज तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| ३४ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. ०४ मध्ये हनुमान मंदिर मागे समाज हॉल बांधणे. | ५०.०० | ३५.०० | १५.०० |
| ३५ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र. ०४ (क) आमपाडा येथे मुन्ना सेठ घर नं. ५३३/१ ते घर नं. १४४ पर्यंत कॉंक्रिट रस्ता तयार करणे व इतर ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे | ७०.०० | ४९.०० | २१.०० |
| ३६ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ०३ अंतर्गत कॉंक्रिट रस्ता तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| ३७ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र.३ सुरेश पाटील यांच्या घरापासुन अरूणपाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. | ०५.०० | ३.५० | १.५० |
| ३८ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ०३ मध्ये पोगाव येथे बाळाराम पाटील यांच्या घरापासुन ते तुषार गायकर यांच्या घरापर्यंत कॉंक्रिट रस्ता तयार करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| ३९ | भिवंडी- निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ०३ मध्ये तुकाराम भालेकर यांच्या घरापासुन ते एकनाथ। पाटील यांच्या घरापर्यंत गटार रस्ता तयार करणे. | ०५.०० | ०३.५० | १.५० |
| ४० | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ३ दुर्गानगर, गायत्रीनगर येथे गटार व कॉंक्रिट रस्ता तयार करणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| ४१ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ३ शिवनेरी गल्ली व संभाजी नगर परिसरात गटार व कॉंक्रिट रस्ता तयार करणे. | १०.०० | ७.०० | ३.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४२ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. ३ आदिवासी ब्राम्हणपाडा पोगाव येथे पाण्याची नविन पाईप लाईन टाकणे. | १५.०० | १०.५० | ४.५० |
| ४३ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. २ मधील फुरकानिया मस्जिद नदी नाका व विविध ठिकाणी सीसी गटार व पदपथांचे बांधकाम करणे. | २०.०० | १४.०० | ६.०० |
| ४४ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील वार्ड क्र. २ मधील फैजान मोमीन घराजवळ नजीर कंपाऊंड आणि विविध ठिकाणी सीसी गटार व पदपथांचे बांधकाम करणे | २०.०० | १४.०० | ६.०० |
| ४५ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील पिराणी पाडा, SK बार कंपाऊंड, अन्सारनगर येथे गटार व कॉंक्रिट रस्ता तयार करणे | २०.०० | १४.०० | ६.०० |
| ४६ | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका हद्दीतील गायत्रीनगर, गणेश मंदीर वरच्या भागात पाथवेज बनवून रस्ता तयार करणे. | १०.०० | ७.०० | ३.०० |
| | एकूण | **११७०.००** | **८१९.००** | **३५१.००** |

संदर्भ क्र. २ अन्वये नमुद केलेली विकास कामे खालील प्रमाणे आहेत.

| | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रु. लाखात) | शासन हिस्सा ७० टक्के (रु.लाखात) | मनपा हिस्सा ३० टक्के(रु. लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.९ मध्ये समाज हॉल आणि व्यायाम शाळा बांधणे | ५०.०० | ३५.०० | १५.०० |
| २ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.११ नांगाव मधील विविध ठिकाणी गटार व पाथवेज बनविणे | ५०.०० | ३५.०० | १५.०० |
| ३ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.६ मध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे | ३०.०० | २१.०० | ९.०० |
| ४ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.१६ मध्ये शास्त्रीनगर परिसरामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे | ३०.०० | २१.०० | ९.०० |
| ५ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.१७ मध्ये वॉटर सप्लाय कॉलनी परिसरामध्ये समाज हॉल बांधणे | ३०.०० | २१.०० | ९.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.२१ मध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे | ३०.०० | २१.०० | ९.०० |
| ७ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.१६ मध्ये शास्त्रीनगर परिसरामध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे | ३०.०० | २१.०० | ९.०० |
| ८ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.२२ मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रिट रस्ता बनविणे | ३०.०० | २१.०० | ९.०० |
| ९ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.८ मध्ये रामेश्वर समशान भूमी मध्ये पेव्हर ब्लॉक आणि सुशोभिकरण करणे | २५.०० | १७.५० | ७.५० |
| १० | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.२२ मध्ये विविध ठिकाणी गटर बांधणे | २५.०० | १७.५० | ७.५० |
| ११ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.११नांगाव मधील विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे | २५.०० | १७.५० | ७.५० |
| १२ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.१३ मध्ये आदिवासी पाडा एकविरानगर परिसरामध्ये गटर पेव्हर ब्लॉक बसविणे | २०.०० | १४.०० | ६.०० |
| १३ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र९ कापआळी परिसरात पाण्याची लाईन बसविणे **(पा.पु.वि)** | १५.०० | १०.५० | ४.५० |
| १४ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र१ संगमपाडा परिसरात पाण्याची लाईन बसविणे **(पा.पु.वि)** | १५.०० | १०.५० | ४.५० |
| १५ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र१० कचेरीपाडा परिसरात पाण्याची लाईन बसविणे **(पा.पु.वि)** | १५.०० | १०.५० | ४.५० |
| १६ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.१७ मध्ये काबुकरांच्या ऑफिसच्या समोर सुशोभीकरण करणे व चौक बांधणे | १५.०० | १०.५० | ४.५० |
| १७ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.१० मध्ये कचेरीपाडा परिसरात सुशोभीकरण करणे व चौक बांधणे | १५.०० | १०.५० | ४.५० |
| १८ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र१५ मध्ये गौतम कंपाऊंड येथे स्ट्रीट लाईट्स बसविणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| १९ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र२२ मध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट्स बसविणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| २० | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र१६ मध्ये बी बी ठिकाणी स्ट्रीट लाईट्स बसविणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| २१ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र१६ मध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट्स बसविणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| २२ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.२१ मध्ये चैतन्य बिल्डींग परिसरामध्ये गटर पेव्हर ब्लॉक बसविणे | १०.०० | ७.०० | ३.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.२१ मध्ये चंदनबाग परिसरामध्ये गटर पेव्हर ब्लॉक बसविणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| २४ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.२३ मध्ये गल्ली नंबर ५० परिसरामध्ये गटर पेव्हर ब्लॉक बसविणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| २५ | भिवंडी शहरातील वॉर्ड क्र.२३ मध्ये हनुमान नगर परिसरामध्ये गटर पेव्हर ब्लॉक बसविणे | १०.०० | ७.०० | ३.०० |
| | एकूण | **५३०.००** | **३७१.००** | **१५९.००** |

**संदर्भ क्र. ३ अन्वये नमुदकेलेली विकासकामे खालील प्रमाणे आहेत.**

| | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रु. लाखात) | शासन हिस्सा ७० टक्के (रु.लाखात) | मनपा हिस्सा ३० टक्के (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | मनपा शाळा क्र. ५६ गांवच्या बाजूला असलेली जुनी व्यायाम शाळा दुरुस्ती करणे, व्यायामाचे साहित्य पुरविणे | ५०.०० | ३५.०० | १५.०० |
| २ | गायत्रीनगर, नुरीनगर कब्रस्तान ते बीएमसी पाईपलाईन पर्यंतआर. सी. सी. रस्ता तयार करणे, सोलर हायमास्ट लावणे, गटार तयार करणे, पेव्हर ब्लॉक लावणे, कब्रस्तानला वॉलबाड़ी करणे | १००.०० | ७०.०० | ३०.०० |
| ३ | नागाव, गायत्रीनगर, चंदनकोळी वाडा व ज्योत्सनानगर याठिकाणी गटर व पाथवेज बसविणे. | २५.०० | १७.५० | ७.५० |
| ४ | नागाव गावातील हिंदुस्मशान भूमी सुशोभिकरण करणे | २५.०० | १७.५० | ७.५० |
| ५ | प्र.स.क्र. १, मन्सूराबाद, गायत्रोनगर, भिवंडीयेथे ८०० फुटाचे क्षेत्रात नविन गटर बनविणे. | १२.०० | ८.४० | ३.६० |
| ६ | प्र.स.क्र. १, मन्सूराबाद, गायत्रीनगर,येथे पेव्हरब्लॉक बनविणे, | १०.०० | ७.०० | ३.०० |
| ७ | प्र.स.क्र. १, उम्मतनगर, गायत्रीनगर, भिवंडीयेथे १००० फुटाचे क्षेत्रात नविन गटर बनविणे. | १५.०० | १०.५० | ४.५० |
| ८ | प्र.स.क्रा १रफिक नगर येथे नाला बनविणे. | १०.०० | ७.०० | ३.०० |
| ९ | प्र.स.क्र. १, मरियम मस्जिदजवळ, भिवंडी येथे ८०० फुटाचे क्षेत्रात नविन गटर बनविणे | १३.०० | ९.१० | ३.९० |
| १० | प्र.स.क्र. १. फातमानगर, फातमा मस्जिद जवळ, भिवंडी येथे १००० फुटाचे क्षेत्रात नविन गटर बनविणे. | १५.०० | १०.५० | ४.५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | प्र.स.क्र. १, फातमानगर, ६० फिट रोड, भिवंडी येथे १००० फुटाचे क्षेत्रात नविन गटर बनविणे. | १५.०० | १०.५० | ४.५० |
| १२ | प्र.स.क्र. १. फातमानगर, २० फिट रोड, भिवंडी येथे ५०० फुटाचे क्षेत्रात नविन गटर बनविणे. | १०.०० | ७.०० | ३.०० |
| १३ | गटर, नाला, पेव्हरब्लॉक व इतर विकास कामे करणे | १००.०० | ७०.०० | ३०.०० |
| १४ | चाविदा ते पोगांव या ठिकाणी पेव्हरब्लॉक बसवणे, गटर बनवणे, नूरीनगर कब्रस्तान येथे बॉल बाँड्री बनविणे. | १००.०० | ७०.०० | ३०.०० |
| | **एकूण** | **५००.००** | **३५०.००** | **१५०.००** |

वरील संदर्भ क्र. १,२ व ३ मधील महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान योजनेची कामे ही बांधकाम विभाग ,पाणी पुरवठा विभाग व विद्युत विभागाची आहेत त्याचा तौलनिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| संदर्भ क्रमांक | विभागाचे नाव | एकूण कामे | मंजूर रक्कम (रु. लाखात) | शासन निधी ७०% (रु. लाखात) | मनपा निधी ३०% (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बांधकाम विभाग | ४५ | ११५५.०० | ८०८.५० | ३४६.५० |
| | पा.पु.विभाग | ०१ | १५..०० | १०.५० | ४.५० |
| २ | बांधकाम विभाग | १८ | ४४५.०० | ३११.५० | १३३.०० |
| | पा.पु.विभाग | ०३ | ४५.०० | ३१.५० | १३.५० |
| | विद्युत विभाग | ०४ | ४०.०० | २८.०० | १२.०० |
| ३ | बांधकाम विभाग | १४ | ५००.०० | ३५०.०० | १५०.०० |
| | **एकूण** | **८५** | **२२००.००** | **१५४०.००** | **६६०.००** |

संदर्भ क्र. १ मधील प्रस्तावित ४६ कामांचे एकूण रक्कम रु.११७०.०० लक्ष व संदर्भ क्र.२ मधील प्रस्तावित २५ कामांचे एकूण रक्कम रु. ५३०.०० लक्ष असून संदर्भ क्र.३ मधील प्रस्तावित १४ कामांचे एकूण रक्कम रु.५००.०० तिन्ही मिळून ८५ विकास कामांचे रक्कम रु. २२००.०० लक्ष इतकी होत असून शासनाचा ७० टक्के हिस्सा रु.१५४०.०० लक्ष इतका असून उर्वरित मनपाचा ३० टक्के हिस्सा रक्कम **रु.६६०** लक्ष इतका होणार आहे. सद्यस्थितीत शासन योजने अंर्तगत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षाखाली रु.८४.१४ लक्ष शिल्लक आहेत. त्यामुळे ८५ विकास कामे करणेकरीता मनपा हिस्स्याची ३० टक्के रक्कम रु.६६०.०० लक्ष रुपयाचे इतर विभागाच्या लेखामधून पुनर्विनियोजन करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दिनांक १७/०१/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी स्व.मिनाताई ठाकरे नाटयागृह देखभाल व दुरुस्ती या लेखामधून रु.२ कोटी ६० लक्ष व नगरसेवक निधी मधून रु.४ कोटी घेवून पुनर्विनियोजन करावे लागणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या

अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१८/१/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. १८/१/२०२४ पर्यंतची शिल्लक | शेरा (मुळ तरतूद + पुनर्विनियोजनाने घेतलेली तरतूद सह तरतूद रक्कम) |
|---|---|---|---|---|---|
| १ | शासन योजने अंर्तगत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | रु. २५०.०० लक्ष | रु.१६५.८५ लक्ष | रु.८४.१५ लक्ष | (१००+१५०.०० = २५०.०० लक्ष) |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, शासन योजने अंर्तगत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामधील निधी कमी असल्यामुळे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान जिल्हास्तर योजने अंर्तगत ८५ विकास कामे करणेकरीता रु.६६०.०० लक्ष रक्कमेचे पुनर्विनियोजन पुनर्विनियोजन करावे लागणार आहे.

**खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.**

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१८/१/२०२४ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम | दि.१८/१/२०२४ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्व.मिनाताई ठाकरे नाटयागृह देखभाल व दुरुस्ती | रु.६००.०० लक्ष | रु.०.०० लक्ष | रु.२६०.०० लक्ष | रु.२६०.०० लक्ष |
| २ | नगरसेवक निधी | रु.९७०.८८ लक्ष | रु.२.०८ लक्ष | रु. ९६८.८० लक्ष | रु.४००.०० लक्ष |
| | एकूण | | | | **रु.६६०.०० लक्ष** |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांच्याकडे निहीत आहेत.

त्या अनुषंगाने शासन योजने अंर्तगत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये "स्व.मिनाताई ठाकरे नाटयगृह देखभाल व दुरुस्ती " व " नगरसेवक निधी" या दोन्ही लेखाशिर्षामधून रु.६६०.०० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास दिनांक १७ /०१ /२०२४ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा, ही विनंती.

P.T.O

**ठराव क्र.** ३८३ **दिनांक** ०५/०२/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती अभियाना जिल्हास्तर नियोजन अंतर्गत कामे करण्यासाठी ८५ विकास कामांचे रक्कम रु. २२००.०० लक्ष इतका खर्च होणार असून त्यातमध्ये शासनाचा ७० टक्के हिस्सा रु.१५४०.०० लक्ष इतका असून उर्वरित मनपाचा ३० टक्के हिस्सा रक्कम **रु.६६०** लक्ष इतका होणार आहे. सद्यस्थितीत शासन योजने अंर्तगत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षाखाली निधी कमी असल्यामुळे एकूण ८५ विकास कामे करणेकरीता मनपा हिस्स्याची ३० टक्के रक्कम रु.६६०.०० लक्ष रुपयाचे इतर लेखाशिर्षामधून उपलब्ध करणे आवश्यक असल्यामुळे स्व.मिनाताई ठाकरे नाटयागृह देखभाल व दुरुस्ती या लेखामधून रु.२ कोटी ६० लक्ष व नगरसेवक निधी मधून रु.४ कोटी असे रु.६६०.०० लक्ष रुपयाचे शासन योजने अंर्तगत विकास कामांकरीता मनपा हिस्सा या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**प्रस्तावना :- मनपा मालकीचे फिरते शौचालय भाडेत्वावर देणे बाबत मा.प्रशासक तथा आयुक्त साो. यांची मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव**

मनपा कार्यक्षेत्रातील स्थानिक नागरिकांच्या सोई करिता सार्वजनिक शौचालय उपलब्ध करुन देण्यात आले असुन शौचालय विभागाकडील आरोग्य निरिक्षक यांना सादर केलेल्या अहवालानुसार तयार करण्यात आलेले सार्वजनिक शौचालय कमी प्रमाणात आहे.तसेच ज्या टिकाणी नवीन सार्वजनिक शौचालय उभारणेचे काम सुरु असुन स्थानिक नागरिकांच्या शौचालय अभावी मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असुन तसेच ज्या ठिकाणी सार्वजनिक शौचालय नाहीत व जागा अभावी सार्वजनिक शौचालय बांधकाम होवु शकत नाही अश्या ठिकाणी आरोग्य निरिक्षक, सिटी/पिटी विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मनपा कार्यक्षेत्रात एकुण ५ युनिट फिरते शौचालय उपलब्ध होणेसाठी ६ सिट्स असलेले ५ युनिट फिरते शौचालय उपलब्ध करुन घेण्यात आले आहे.

धार्मिक कार्यक्रम,लग्न समारंभ किवा इतर ठिकाणी फिरते शौचालयाची मागणी केली जाते असल्याने मागणी नुसार सदर ठिकाणी फिरते शौचालय उपलब्ध करुन दिले जातात परंतु असे निदर्शनास येत आहे की,फिरते शौचालय मनपा कडुन चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन दिले गेल्यानंतर सदरचे शौचालय साफ सफाई केली जात नसुन फिरते शौचालयाचे नुकसान करण्यात येते.त्यामुळे सदरचे फिरते शौचालय दुरुस्ती करणे कामी महानगरपालिकेस नाहक आर्थिक भुर्दड बसतो.

यासाठी खालील प्रमाणे फिरते शौचालय भाडेतत्वावर देणेचे दर प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र | कार्याचे स्वरुप | फी |
|---|---|---|
| १ | धार्मिक संमेलन व सप्ताह महापालिका क्षेत्रातील विविध धार्मिक व समाजपयोगी कार्यक्रमासाठी मागणी केल्यास (जेथे मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय जमतो तेथे) | रु.५००/- प्रति दिन |
| २ | सामाजिक उत्सव,जत्रा,मेळावे व तत्सम कार्यक्रम | रु.१०००/- प्रति दिन |
| ३ | लग्न सणारंभासारखे खाजगी कार्यक्रम | रु.२०००/- प्रति दिन |
| ४ | व्यापारी उत्सव, | रु.५०००/- प्रति दिन |
| ५ | महानगरपालिकेचे स्वतःचे कार्यक्रम,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील शासकिय कार्यक्रम, मनपाचे सार्वजनिक शौचालय जुने तोडुन नवीन बांधकाम करते वेळीस काम पुर्ण होई पर्यंत, | मोफत |
| ६ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्राबाहेरील कार्यक्रम | वरिल कार्याचे स्वरुपा नुसार प्रति दिना प्रमाणे नमुद दर हे दुप्पट राहतील |
| टिप :- मनपा कार्यक्षेत्रात फिरेत शौचालय उपलब्ध करुन दिल्यास त्यासोबत मनपाचा एक कर्मचारी उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहिल त्याचे प्रत्येकी दिवसाचे किमान वेतन कायदाप्रमाणे रु.८६८/- इतकी रक्कम शौचालय फी व्यतिरिक्त भरावी लागेल. | | |

तरी वरिल प्रस्तावित केल्यानुसार भिवंडी निजामपुर महानगरपालिके मार्फत खरेदी करण्यात आलेल्या फिरते शौचालय भाडेतत्वार दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पनात भर येवुन पुढील कालावधीत शौचालय दुरुस्ती बाबत आर्थिक बाबी मुळे अडचण निर्माण होणार नाही.

❖ फिरते शौचालय भाडेतत्वावर देणे पुर्वी संबंधित अर्जदार यांना खालील नमुद अटी शर्तीचे बंधनकारक राहतील.

१. शौचालय ०६ सिट्स प्रति १ युनिट करिता रु.१०,०००/- मात्र (दहा हजार रुपये मात्र) सुरक्षा रक्कम (डिपॉजिट रक्कम) घेणे आवश्यक आहे.
२. सदर ठिकाणी पाण्याची व्यवस्थाची आवश्यकता असल्यास मनपाच्या टॅकरद्वारे करावी लागल्यास मनपाने पाण्याच्या टॅकरसाठी ठरविलेली फी संबंधित विभाग़ात अर्जदार यांनी स्वतंत्र अर्ज सादर करुन फी भरणा करावी.
३. सदर शौचालयाची काहीही तुटफुंट झाल्यास मनपा फंडात अर्जदार यांनी जमा केलेल्या सुरक्षा अनामत रक्कम मधून दुरुस्तीचा खर्च कपात करण्यात येईल.
४. फिरते शौचालय मनपा कोंडवाडा अथवा इतर जागेतुन घेवुन जाणे व मनपा कोंडवाडा येथे किंवा मनपा सुचवेल अशा ठिकाणी पोहचविण्याची जबबाबदीर ही संबंधित अर्जदार यांची राहिल.वाहतुक खर्च मनपा करणार नाही संबंधित अर्जदार यांना करावी लागणार आहे.
५. सदरचे शौचालय घेवुन जातांना अपघात झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहिल. त्याकरिता फिरते शौचालय दुरुस्ती कामी लागणार खर्च अर्जदार यांनी करावयाचा आहे.त्याबाबत महानगरपालिकेची कोणताही जबाबदारी राहणार नाही.
६. सदरचे शौचालय अर्जदार यांनी सुस्थितीत देण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहिल.

७. शौचालय मागणी करिता अर्जदार यांनी किमान आठ दिवसा अगोदर अर्ज सादर करुन सोबत चालु वर्षातील घरपट्टी पावती, आधार कार्ड देणे बंधनकारक आहे.
८. अर्जदार यांनी सुरक्षा रक्कम मनपा फंडात परत मागणी करिताना मुळ पावतीसह अर्ज सादर करणे बंधनकारक राहिल.
९. तसेच कार्याचे स्वरुपात नमुद दर हे दर तीन वर्षा नंतर १० टक्के भाववाढ करण्यात येईल.
१०. वरील तौलनिक तत्क्यातील कार्याच्या स्वरुपानुसार फिरते शौचालयाची स्वच्छते विषयक कामे करणेसाठी मनपा मार्फत एक कर्मचारी उपलब्ध करुन दिला जाईल.

तरी भिवंडी मनपा मालकीचे फिरते शौचालय महानगरपालिका कार्यक्षेत्रात व ग्रामिण मध्ये भाडेतत्वावर देणे कामी धोरणात्मक बाब असल्याने सद्यास्थित मा.महासभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

**प्रशासक ठराव क्र.** ३८४ **दि.** ०९/०२/२०२४

मनपा मालकीचे ६ सिट्स असलेले ५ युनिट फिरते शौचालय उपलब्ध करुन घेण्यात आले असल्याने उक्त फिरते शौचालय भाडेतत्वावर देणे कामी मागील पानावरील कार्या स्वरुपा नुसार संबंधित नागरिक यांचे विनंती अर्जानुसार भाडेतत्वावर देणे कामी विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी मनपा मालकीचे फिरते शौचालय महानगरपालिका कार्यक्षेत्रात व ग्रामिण भागा मध्ये भाडेतत्वावर प्रति दिन नमुद फि घेणेसाठी विभागा खालील प्रमाणे प्रस्तावित केले आहे.

| अ.क्र | कार्याचे स्वरुप | फी |
|---|---|---|
| १ | धार्मिक संमेलन व सप्ताह महापालिका क्षेत्रातील विविध धार्मिक व समाजपयोगी कार्यक्रमासाठी मागणी केल्यास (जेथे मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय जमतो तेथे) | रु.५००/- प्रति दिन |
| २ | सामाजिक उत्सव,जत्रा,मेळावे व तत्सम कार्यक्रम | रु.१०००/- प्रति दिन |
| ३ | लग्न सणारंभासारखे खाजगी कार्यक्रम | रु.२०००/- प्रति दिन |
| ४ | व्यापारी उत्सव, | रु.५०००/- प्रति दिन |
| ५ | महानगरपालिकेचे स्वतःचे कार्यक्रम,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील शासकिय कार्यक्रम, मनपाचे सार्वजनिक शौचालय जुने तोडुन नवीन बांधकाम करते वेळीस काम पुर्ण होई पर्यंत, | मोफत |
| ६ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्राबाहेरील कार्यक्रम | वरिल कार्याचे स्वरुपा नुसार प्रति दिना प्रमाणे नमुद दर हे दुप्पट राहतील |
| टिप :- मनपा कार्यक्षेत्रात फिरेत शौचालय उपलब्ध करुन दिल्यास त्यासोबत मनपाचा एक कर्मचारी उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहिल त्याचे प्रत्येकी दिवसाचे किमान वेतन कायदाप्रमाणे रु.८६८/- इतकी रक्कम शौचालय फी व्यतिरिक्त भरावी लागेल. | | |

वरिल नमुद कार्याचे स्वरुपा प्रमाणे नमुद अटी शर्तीस अधिन राहुन मनपा मालकीचे फिरते शौचालय भाडेतत्वावर देणेकामी मंजुरी देण्यात येत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

संगणक विभाग

**प्रस्तावना :-**

**विषयः - भिवंडी निजापमूर शहर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी अद्ययावत बायोमेट्रीक मशिनद्वारे नोंदविणेकामी बायोमेट्रीक मशिन खरेदी करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी अद्ययावत बायोमेट्रीक मशिनद्वारे नोंदविणेकामी नवीन अद्ययावत बायोमेट्रीक मशिन खरेदी कामी रक्कम रु.७५,४४,६५२/- मात्रच्या प्रस्तावास उपआयुक्त (संगणक), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रशासकीय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

**ठराव क्र.** 384 **दिनांक :-** 09/02/**२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची दैनंदिन हजेरी अद्ययावत बायोमेट्रीक मशिनद्वारे नोंदविणेकामी नवीन अद्ययावत बायोमेट्रीक मशिन खरेदी कामी रक्कम रु.७५,४४,६५२/- मात्रच्या प्रस्तावास उपआयुक्त (संगणक), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतूदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन हजेरी अद्ययावत बायोमेट्रीक मशिनद्वारे नोंदविणेकामी नवीन अद्ययावत बायोमेट्रीक मशिन खरेदी कामी रक्कम रु. ७५,४४,६५२/- मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय ठरावाची मंजूरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**